महाराष्ट्र शासन

बाष्पके संचालनालय

माहितीचा अधिकार

# परिपत्रक

**विषय :- राष्ट्रीय शिक्षुता (N.C.V.T.) परीक्षा प्रमाणपत्र साक्षांकनाबाबत.**

वरील विषयान्वये कळविण्यात येते की, जे उमेदवार राष्ट्रीय शिक्षुता प्रमाणपत्र परीक्षा पास झालेले असतील अशा उमेदवारांना बाष्पकावर द्वितीय वर्ग बाष्पक परीचर म्हणून काम करण्याकरिता त्यांचे मूळ प्रमाणपत्र हे कार्यालयाकडून साक्षांकन करुन घेणे बाष्पक परीचर नियम,२०११ नुसार अनिवार्य आहे.

तथापि, पास झालेल्या उमेदवारांना मूळ प्रमाणपत्र मिळण्यास विलंब लागतो म्हणून या कार्यालयाकडून त्यांना त्यांचे गुणपत्रिकेवरुन अस्थायी प्रमाणपत्र दिले जात होते व असे अस्थायी प्रमाणपत्राकरीता उमेदवार तीन वेळा मागणी करत होते.

वास्तविक पाहता बाष्पक परीचर नियम, २०११ नुसार उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र साक्षांकन करुन देणे हेच या कार्यालयाचे काम आहे. परंतु उमेदवारांची गैरसोय होऊ नये याकरीता यापुढे फक्त एक वेळा अस्थायी प्रमाणपत्र देण्यात येईल व या प्रमाणपत्राचा कालावधी पूर्ण होण्याच्या आत संबंधितांनी त्यांचे मूळ प्रमाणपत्र पृष्ठांकन करुन घेणे आवश्यक आहे व यापुढे असे पृष्ठांकन न केलेल्या उमेदवारांची बाष्पक परीचर म्हणून होणारी सेवाही नियमबाहय ठरेल व अशा उमेदवारांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी व यापुढे कोणत्याही स्थितीत द्वितीय अस्थायी प्रमाणपत्राकरीता या कार्यालयाकडे अर्ज करु नये.

सही/-
संचालक, बाष्पके आणि अध्यक्ष
परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.